

# रामबोध

■ बाळ ठाणेदार

अखिल भारतीयांच्या हृदयात अजूनही राम भरून राहिलेला आहे. एका भारतभेटीत मी ग्रामीण भागात गेलो होतो. तेथे जागोजागी मला `श्रीराम जयराम जय जय राम' असे उद्‌गार ऐकावयास मिळाले. मला असे आढळून आले की, दोन व्यक्ती रस्त्यांत जेव्हा समोरासमोर येतात तेव्हा हात जोडून नमस्कार करून परस्परांना रामराम म्हणतात. ईश्वराच्या विश्वासावर चालणारी एखादी संस्था, व्यक्ती किंवा कार्य यासाठी 'रामभरोसे' हा शब्दप्रयोग प्रचलित आहे. 'घटाघटात राम भरलेला आहे' या वाक्याने आपण ईश्वराच्या सर्वव्यापकतेचे चित्रण करतो. सुव्यवस्थित व सुसंपन्न राज्यव्यवस्थेसाठी रामराज्य हे विशेषण आपण वापरतो. सकाळी ५ ते ७ पर्यंतच्या वेळेस रामप्रहर असे म्हटले जाते. यावेळी बहुतेक सर्वच लोक प्रसन्न असतात. राम हा भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ व भारतीय जनतेचे निष्ठास्थान आहे.

राम ही एक संस्कारसंपन्न व दैवी संपत्तीच्या गुणांनी युक्त अशी व्यक्ती होती. रामाच्या जीवनात दिसून येणारी दैवी तेजस्विता आणि सांस्कृतिकता त्याला मिळालेल्या दिव्य शिक्षणाची निशाणी आहे. यज्ञाच्या रक्षणासाठी विश्वामित्र रामाला घेऊन गेले होते, परंतु तेथे ते रामाला वेगळ्याच पद्धतीने शिक्षण देत होते. रामाबरोबर गोष्टी व चर्चा करता करता विश्वामित्रांनी रामाला जीवन शिक्षण दिले. रामाला कळलेदेखील नाही की आपण काही शिकत आहोत आणि विश्वामित्रांनाही कधी वाटले नाही की आपण काही शिकवत आहोत. अशा प्रकारे रोज विश्वामित्र रामाच्या जीवनज्योतीला तेल पुरवत होते. एक अंत:करण दुसऱ्या अंत:करणाशी बोलत असे. विश्वामित्र हृदय मोकळे करून रामाशी बोलत होते.



राम आपल्यासमोर एक कौटुंबिक आदर्श ठेवून गेला आहे. रामाला तीन भाऊ होते. त्यांच्यामध्ये केव्हाही भांडण झाले

नाही. याचे कारण त्यागात पुढे व भोगात मागे हा त्यांचा जीवनमंत्रच होता. राम म्हणजे स्वार्थत्यागाची पराकाष्ठाच. जिथे नेहमी दुसऱ्याचा विचार करण्यात येतो आणि त्यागाची तयारी ठेवण्यात येते तिथे क्लेश किंवा भांडण शेकडो मैल दूर राहते. एक प्रकारची प्रसन्नता म्हणजेच राम.

दुःखाचेवेळी मन चलबिचल होते आणि हातून अधिकच चुका होतात हा माझा स्वतःचा अनुभव. दुःखात असतानाही आत्मसंयमाने वागून रामाने आपल्यापुढे एक उदात्त आदर्श उभा केला आहे. माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या दृष्टीने रामाला खरे सुख मिळाले ते चौदा वर्षे वनवास भोगून आल्यानंतर जेव्हा राज्याभिषेक झाला तेव्हाच. ते सुद्धा फार काळ टिकले नाही. कारण अल्पावधीतच त्याला प्रियपत्नी सीता हिचा त्याग करावा लागला.

सर्व प्रजेचा कौल राम युवराज व्हावा असा होता. अगदी हातातोंडी आलेला हा योग हुकला. यात रामाचा काही दोष होता का? काहीच नाही. सिंहासनावर बसून सुख भोगण्याऐवजी रामाला १४ वर्षे खडतर वनवास भोगावा लागला. वडिलांचे आज्ञापालन करण्यासाठी राम वनवासात गेला असे म्हणावे तर तेही खरे नाही. कारण दशरथाने स्वतःच्या तोंडून 'तू वनवासास जाय` असे रामाला केव्हाही सांगितलेले नाही. राम राज्य सोडून वनवासात गेला तो पित्याला वचनातून मुक्त करण्यासाठी. केवढा हा स्वार्थत्याग रामाचा?

रामाला राज्यावर बसवण्यासाठी दशरथाने प्रजेची अनुमती घेतलेली होती. दशरथाने "आपणास कैद कर व तू राज्यावर बस" असेही म्हटले होते. रामाला सर्व प्रकारची अनुकूलता होती. लक्ष्मण "सर्व भरत पक्षियांना ठार मारून, बापास कैद करून, रामा, तुला राज्य देतो" असे म्हणाला. तेव्हा राम उत्तर देतो, 'हे लक्ष्मणा, तुझा पराक्रम मला माहीत आहे. तू हे सर्व करशील हे खरे आहे. परंतु सर्व जगामध्ये धर्म हा श्रेष्ठ आहे. धर्मावरच सत्य प्रतिष्ठित असते. तेव्हा (अयोध्याकांड, सर्ग २१ श्लोक ४४) 'तदेतां विसृज अनार्यां क्षत्रधर्माश्रितां मतिम्' क्षत्रियाच्या धर्मावर आधारलेली परंतु अनार्य म्हणजे आर्याला न शोभणारी ही बुद्धी तू सोडून दे.'

रामाच्या जागी इतर कोणी क्षत्रिय असता तर त्याने लक्ष्मण म्हणत होता तसेच केले असते. परंतु तसे करणे रामाला पसंत नव्हते. त्याने द्वेषाग्नी भडकणार होता हे तो जाणून होता. दुसरे क्षत्रिय कसे वागतील हे माहीत असूनही त्यावेळी राम तसे वागण्यास तयार झाला नाही. हाच रामाचा मोठेपणा होय.

राम गादीवर बसला असता तर दशरथाच्या घरात कलह निर्माण झाला असता. कैकय राजाशी युद्ध जुंपले असते. त्यात राम-लक्ष्मणांच्या नेतृत्वाखाली रामाचा जय जरी झाला असता तरी प्रजेला भोगावे लागणारे अपरिमित दुःख अटळ होते. त्यापेक्षा आपण राज्याचा त्याग करावा आणि भरताला राज्य द्यावे असा रामाने निश्चय केला. यात त्याने दुहीचे बीजच नष्ट केले. अशा रीतीने त्यागाचा एक अत्युच्च आदर्शच जनतेपुढे ठेवला.

वनवासात असताना राम नगरात रहात नसे. कोणी सुग्रास अन्न इत्यादी पदार्थ दिले तरी घेत नसे. रामाने स्वतः कसोशीने धर्म म्हणून वनवासव्रताचे पालन केले. केलेली प्रतिज्ञा त्याने कसोशीने पाळली. त्याच्यावर दुसऱ्याच्या नियंत्रणाची आवश्यकता नव्हती. किष्किंधा किंवा लंका या नगरांत प्रवेश केला किंवा नाही याची वार्ता कैकेयीस अयोध्येत समजलीही नसती. असे असतानाही रामाने भोगावयाची शिक्षा व प्रतिज्ञा कसोशीने पाळली. रामाने कोणत्याही नगरात प्रवेश केलेला नव्हता. रामाने आत्मनियमनाचे एक उदाहरण घालून दिले.

राम हा हद्दपार झालेला होता. हद्दपार केलेले लोक परराष्ट्रांत स्वतंत्र नागरिक म्हणून राहिलेली उदाहरणे इतिहासात भरपूर सापडतात. रामालाही दुसऱ्या राज्यात सुखाने राहता आले असते. परंतु त्याने तसे केले नाही.

ज्या कैकेयी मातेमुळे वनवासाचा प्रसंग उदभवला त्या मातेबद्दल यत्किंचितही द्वेष किंवा मत्सर न ठेवता तिला राम नमस्कार करायला जातो. रामाच्या चारित्र्याची या घटनेतून स्पष्टता होते.

वालीला मारण्यासाठी राम सुग्रीवला मदत करतो. रावणाला मारून सीतेला परत आणण्याच्या कामात सुग्रीव रामाला मदत करतो. परस्परांच्या शक्तीचे प्रमाण यथार्थ जाणणाऱ्या या दोघांनी एकमेकांची कामे मोठ्या आनंदाने करीत होते. "तुझ्यासारखा मित्र कोठे सापडणार नाही" असे राम सुग्रीवला सांगतो. राम शेवटी शरयू नदीमध्ये प्रवेश करतो. त्यावेळी किष्किंधेहून सुग्रीव धावत येतो व स्वतःही रामाबरोबर शरयूमध्ये प्रवेश करतो. राम आणि सुग्रीव यांची मैत्री आदर्श होती.

■

**बाळ ठाणेदार**